## एम.बी. मोरे महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा आयोजन

रोहा तालुक्यातील धाटाव एम.आय.डी.सी. परिसरातील एम.बी.मोरे फाऊंडेशनचे कला, वाणिज्य आणि विज्ञान कनिष्ठ व वरिष्ठ महाविदयालयात मंगळवार दि. २७.०८.२०१९ रोजी कै. महादेवराव भाऊराव मोरे यांच्या स्मृती दिनानिमित्त जिल्हास्तरीय आंतरमहाविदयालयीन वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली या वक्तृत्व स्पर्धेत रायगड जिल्हयातील अनेक वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील २८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेमध्ये वरिष्ठ गटातून प्रथम क्रमांक कु. तनझील तकीउल्लाह उल्डे (अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज मुरूड), द्वितीय क्रमांक कु.पुनम गणेश भोईर (द.ग.तटकरे आर्टस् आणि कॉमर्स कॉलेज तळा) आणि तृतीय क्रमांक कु.अजय महादेव भोईर (डॉ.पतंगराव कदम आर्टस आणि कॉमर्स कॉलेज पेण या विद्यार्थ्याला मिळाले. तसेच कनिष्ठ गटामध्ये प्रथम क्रमांक कु.अमोल रामचंद्र गोळे (डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज महाड ) द्वितीय क्रमांक कु.समिक्षा अनंत म्हात्रे (एम.बी.मोरे कनिष्ठ महाविद्यालय धाटाव, रोहा) आणि तृतीय क्रमांक कु.ऑगस्टिन ऑल्विन मार्टीन्स (एम.बी.मोरे कनिष्ठ महाविद्यालय रोहा) या विद्यार्थ्याला मिळाले असून या स्पर्धेसाठी प्रा. विजय पाईकराव (माणगाव),प्राध्यापक प्रसन्न म्हसळकर (विज्ञान विभाग प्रमुख) आणि प्रा. माधुरी जाधव (इतिहास विभाग प्रमुख) हे परीक्षक लाभले.

महाविद्यालयाचे प्राचार्य श्री हणमंत गोविंद ढवळे आणि एम.बी.मोरे फाऊंडेशनचे संचालक मा. श्री. अशोकराव महादेवराव मोरे आणि क्रिडा विभाग प्रमुख प्रा. दिपेश भोसले, ग्रंथपाल विभाग प्रमुख प्रा.निर्मला थोरात, अजीवन अध्ययन विस्तार विभाग प्रमुख प्रा. सुनिता पाटील, महीला सक्षमीकरण कक्ष विभाग प्रमुख प्रा. दिपाली वारंगे, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. मयुर पारखर आणि सर्व शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी स्पर्धकांस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.दर्शना शिंदे यांनी केले.

Scanned by CamScanner